# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक २५/०५/२०२५ (रविवार)**

---

**खुनाचा गुन्हा उघड**
**गंभीर जखमी करून खुन करणाऱ्या ३ आरोपीतांना अटक**
**स्थानिक गुन्हे शाखा नागपुर ग्रामीण यांची कामगिरी**

**पोलीस स्टेशन कन्हान:**—पोलीस स्टेशन कन्हान नागपुर ग्रामीण येथे फिर्यादी नामे सौ. कुसुम किशोर सुर्यवंशी, रा. खदान नं ०३ कन्हान हिचा पती मृतक नामे किशोर शिवकरण सुर्यावंशी हा डब्ल्यु. सी. एल. कामठी गार्ड म्हणुन नौकरीवर होता. दिनांक ०४/०५/२०२५ रोजी चे ०४/०० वा ते १२/०० वा. पर्यतची डयुटी करून फिर्यादीचा पती घरी परत जात असतांना शिवगीरी शाळेजवळ खदान नं ३ येथे कोणीतरी अज्ञात इसमाने अज्ञात कारणावरूण फिर्यादीच्या पतीला जिवे मारण्याचा उददेशाने त्याच्या डोक्यावर लाकडी काठी व काचेची बॉटल मरून त्याला गंभीर जखमी केले. त्यानंतर त्याला उपचारकामी त्याला आाशा हॉस्पीटल कामठी येथे दाखल केले. अशा फिर्यादीच्या तक्रार वरून पोलीस स्टेशन कन्हान येथे अज्ञात आरोपीता विरूध्द अप क्र ३५७/२५ कलम १०९, भा.न्या.सं अन्वये गुन्हा नोंद करून तपासात घेतला.नमुद जखमी हा उपचारा दरम्याण मरण पावल्याने कलम १०३(१) भा.न्या.सं अन्वये कलम वाढ करण्यात आली.

कन्हान पोलीसांसह स्थानिक गुन्हे शाखा,नागपुर ग्रामीण यांनी सदर गुन्हयाचा समांतर तपास सुरू केला. स्थानिक गुन्हे शाखा यांच्या पथकाने दिनांक २४/०५/२०२५ रोजी गुप्तबातमीदार आणि तांत्रिक पुराव्यावरून आरोपी नामे **१) सचिन कन्हैयालाल रायपुरे वय २४ वर्ष रा. पाताखेडा ता.सारणी,जि. बैतूल, २) कौशल मधुसूदन रायपुरे, वय ३२ वर्ष रा. रा. दिघावानी ता. परासिया जि. छिंदवाडा राज्य म.प्र.३) पियुष धर्मदास बघेल, वय २० वर्ष, रा. दिघावानी ता. परासिया जि. छिंदवाडा राज्य म.प्र.यांना सारणी जि. बैतुल तसेच छिंदवाडा येथुन ताब्यात घेवुन यांचा कडे**

**विचारपुस केली असता नमुद आरोपीतांनीच मृतक यास गंभीर जखमी केल्याची माहीती प्राप्त झाली. आरोपीतांनी मृतकास गंभीर जखमी केल्याने मृतक मयत झाला. नमुद आरोपीतांच्या ताब्यातुन मोबाईल जप्त करण्यात आले आहे. आरोपीतांना कन्हान पोलीसांच्या ताब्यात देंण्यात आले असुन  कन्हान पोलीसांनी अटक केली आहे.नमुद आरोपीतांना दिनांक २८/०५/२०२५ रोजी पर्यंत पोलीस कोठडी रिमांड मंजुर झाला आहे.**

## खून करणाऱ्या आरोपीला कोर्टातुन आजीवन कारावासाची शिक्षा

**पोलीस स्टेशन कन्हान** :— फिर्यादी नामे सौ हंसा बलेंद्र मालाधरे, वय ३६ वर्षे, रा. वार्ड क्रं ०३, धरमनगर, कन्हान ता. पारशिवणी यांच्या रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन कन्हान येथे अप क्र. २६१/२०२० कलम ३०२,३४ भादंवि अन्वये गुन्हा नोंद झालेला होता.

सदर गुन्हयाची हकीकत याप्रमाणे आहे की, दिनांक २९/०७/२०१८ चे १७/१५ ते १७/३० वाजेच्या दरम्यान नमुद गुन्हयातील दोन्ही विधी संघर्षीत बालक मोटार सायकल ने रोडवर पाय घासत जात असता यातील मृतक नामे अभिषेक बलेंद्र मालाधरे, वय १७ वर्षे, रा. वार्ड क्रं ०३, धरमनगर, कन्हान ता. पारशिवणी व त्याच्या मित्र यांनी  त्यांना हटकले असता त्यांच्यात झगडा भांडण होवून मारपिट झाली. त्यानंतर विधी संघर्षीत बालक क्र.०२ याने मृतकास 'रूक तुझे बताता हु' असे म्हणून घरी जावून आरोपी क्रं १ नामे  **मुकेश लालाजी महातो वय ४९ वर्ष रा. रामनगर, पिपरी, कन्हान** आणि  विधी संघर्षीत बालक क्र.०३ यांचे सोबत संगनमत करून धरमनगर येथील हनुमान मंदीराचे समोर जावुन यातील मृतकास चाकुने वार करून गंभीर जखमी केले. मृतकाला मेयो हॉस्पीटल येथे उपचाराकामी नेले असता डॉक्टरांनी त्याला तपासुन मृत घोषीत केले, अशा फिर्यादीच्या रिपोर्ट वरून सदरचा गुन्हा नोंद आहे.

सदर गुन्हयाचा तपास सहा.पोलीस निरीक्षक नितीन आगाशे, पो. स्टे. कन्हान यांनी करून सदर प्रकरण न्यायदानासाठी  मा. न्यायालयात दाखल केले होते. सदर प्रकरणात मा. सदर्थ जिल्हा व सत्र न्यायाधीश क्रं ०६ श्रीमती एस.एम.बैस यांनी  दिंनाक २३/०८/२०२३ रोजी नमुद **आरोपी नामे  मुकेश लालाजी महातो, वय ४९ वर्षे ,रा. रामनगर पिपरी कन्हान याला कलम ३०२,३४ भादवी  मध्ये आजीवन कारावास व २०,००० /—रू. दंड, दंड न भरल्यास ६ महीने साधा कारावास अशी शिक्षा ठोठावली आहे**.

सरकारचे वतीने ए. पी. पी. श्रीमती सी. एस. पौनीकर यांनी काम पाहीले. कोर्ट कामात पैरवी अंमलदार म्हणुन पोलीस अंमलदार ईश्वर हुड पो.स्टे. कन्हान यांनी मदत केली आहे

## जनावरांची अवैधरित्या वाहतुक करणाऱ्या आरोपीतांविरूध्द कारवाई

**पोलीस स्टेशन मौदा** :—दिनांक २४/०५/२०२५ रोजी मौदा पोलीस गौणखनिज वाहतुक तपासणी नाका चौकी येथे हजर असतांना त्यांना गुप्त बातमीदारांकडुन खात्रीशीर माहीती मिळाली की भंडारा कडुन नागपुर कडे बोलोरो पिकअप वाहनाने अवैधरित्या जनावरांची वाहतुक केली जात आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे पोलीसांनी वाहनाची तपासणी केली असता बोलोरो पिकअप एम.एच ३१ एफ.सी ०३११ भंडारा कडुन नागपुर कडे येताना मिळुन आले. वाहन थांबवुन वाहनाची पाहणी केली असता त्यामध्ये ५ म्हशी बाधुंन निर्दयते कोंबुन वाहतुक करतांना मिळुन आले .तसेच चालक **उमेश फेदलाजी टेंभरे, वय ३० वर्षे, रा. बरेडीपार, ता. तिरोडा, जि. गोंदीया** हा मिळुन आला. **पोलीसांनी पंचासमक्ष आरोपीच्या ताब्यातुन एक बालेरो पिकअप एम.एच ३१ एफ.सी ०३११ किंमती ३,००,०००/— रूपये. व ५ म्हशी किंमती १,००,००० /— रूपयाचा एकुण किंमती ४,००,०००/— रूपयाचा मुददेमाल जप्त केला आहे**.

चालक आरोपी उमेश फेदलाजी टेंभरे, वय ३० वर्षे, रा. बरेडीपार, ता. तिरोडा, जि. गोंदीया याच्या विरूध्द प्रा.छ. अधि.अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

मा. पोलीस अधिक्षक
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
यांच्या मान्यतेने